# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३**

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता**<br>**बाब क्रमांक: २७७, रूपये:- ५८,५६,००,००,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (१) | ६०४० | १० | जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील रावेर तालुक्यातील अनेक गाव हे नियोजन पासून वंचित असल्याने पाणीपुरवठा विभाग व जल जीवन मिशन अंतर्गत येणाऱ्या योजनेने रावेर तालुक्यातील मशीनच्या माध्यमातून 1)अहिरवाडी, 2)रोझोडा, 3)ताड जिन्सी, 04)विश्राम जिन्सी (जी.पी. जिन्सी), 05)गुलाबवाडी (जि.पी. जिन्सी), 06)निमड्या07)पिपरकुंड (ग्रं. निमड्या), 08)गरवार्डी या गावांना नवीन योजना राबविण्याबाबत शासनाकडे केलेला पाठपुरावा व सातत्याने केलेली मागणी याकडे शासनाचे व विभागाचे झालेले अक्षम दुर्लक्ष व शासनाने फिरवलेले पाठ याबाबत तसेच खालील सुचवलेल्या कामांना तात्काळ निधी उपलब्ध करून प्रत्येक गावांमध्ये जीवन मशीन योजनेअंतर्गत राबविण्याबाबत शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६०४१ | १० | जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील पाणीपुरवठ्यात संदर्भात अनेक गावांमधून सातत्याने शासनाकडून अद्याप पाणी योजना सुरळीत करण्यात आली नसल्याने सदर योजना ही जलजन मिशन अंतर्गत यावल तालुक्यातील 1)टाकरखेडा, 2)कठोर Q.S. (जी.पी. कसावा), 3)अकलुद (ग्रा.प. कासवा), 4)मैसवाडी, 5)वडोदरा प्रासा, 6)करंजी (जी.पी. वधोडा प.स.), 7) रिघुरी (जी.पी. वधोडा ए.एस.), 8)बामनोड, 9) डोंगरडे कठोरा, 10) डोंगरडे (ग्रा.प. डोंगर कठोरा), 11) काळडोह (ग्र. हिंगोणा), 12) टेभिकरण (ग्रं. पं. भालशिव), 13) टेंभी खुर्द. (ग्रा. पी. निमगाव), 14) आसरा बारी (ग्रा.प. बडी), 15) बागवृद (ग्रा.प्र. अंजळे), 16) व्रडी या गावांमध्ये मंजूर करून व निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन व विभाग कोणते कार्यवाही करत नसल्याने वरील सुचवलेल्या कामांना अंतर्गत तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात संदर्भात व योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (३) | ६०९४ | १० | ता. पुरंदर, जि.पुणे येथील सासवड ता. पुरंदर, जि.पुणे करीता जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणीपुरवठा योजना मंजूर असून सदर योजनेत जुन्या गावठाणातील परिसर समाविष्ट आहे. परंतु यामध्ये वाड्या, वस्त्या व नवीन विकसित होत असलेल्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भागाच्या समावेशासह मंजूर टाकीची क्षमता व उंची वाढविणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (४) | ६०१३ | १०० | राज्यात पालघर जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत पालघर जिल्हा परिषदे पाणी पुरवठ्याची कामे अपूर्ण असल्याची बाब माहे. मे 2023 मध्ये निदर्शनास येणे, परिणामी या अपूर्ण कामामुळे लाभार्थी आणि स्थानिक रहिवाश्यांची मोठ्या प्रमाणात पाण्या आभावी गैरसोय होत असणे, या मध्ये कंत्राटदारांनी निकृष दर्जाचे साहित्य पुरवल्या असल्याने या कामांचा दर्जा बेसुमार होत असल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधींनी वारंवार करूनही प्रशासनांने दुर्लक्ष केल्याने मोठ्या प्रमाणात अनियमितत होत असल्याची नाकारता येत नसणे, त्यामुळे यातील सर्व कंत्राटदारांनी केलेल्या सर्व कामांची गुण नियंत्रक विभागाकडून सखोल चौकशी करण्याची गरज असणे, जल जीवन मिशन अंतर्गत निविदा प्रक्रिया राबविताना ठेकेदाराकडे अनुभव प्रमाणपत्र नसणे, या ठेकेदारांनी दुसऱ्यांचे ठेकेदाराचे पेपर जोडून जॉईंट वेंचर ने निविदा प्रक्रिये मध्ये भाग घेताना घातलेल्या अटींची पूर्तता न करणे, सदर अट घालताना कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत निबंध कार्यालय, बांद्रा, मुंबई यांच्या कडून पार्टनरशिप डीड करून घेणे बंधनकारक करणे, या व इतर अनेक अटींची पूर्तता करण्यास हे कंत्राटदार सक्षम नसतानाही शासनाने या ठेकेदाराची बिले मंजूर करताना कार्यकारी अभियंता यांनी कोणतीही खातरजमा केलेली नसणे, या संदर्भात पालघर जिल्हा परिषद सदस्यांने दि. 31 / 05 / 2023 रोजी मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई - 32 व इतर संबंधित विभाग यांना लेखी निवेदन देण्यात येणे, याकरिता शासनाने मूळ ठेकेदारांनी खरेदी केलेल्या कंपनी कडून देण्यात आलेल्या कर चलन, वितरण चलन, व इतर संबंधित कागदपत्रे व इतर संबंधित कागदपत्रे त्रयस्थ संस्थेकडून तपासण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २४ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई